ठाणे शहर

क्र.पोउपा/वाहतुक/प्रशा-१/अधिसुचना/ ५२ /२०१६
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग यांचे कार्यालय,
ठाणे शहर. दि. ३१ /०८/२०१६

## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

ज्याअर्थी, उल्हासनगर शहर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद व कुळगांव- बदलापुर नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात रिक्षा चालक रिक्षा स्टॅण्डच्या ठिकाणी रिक्षा न थांबविता स्वत:च्या सोईच्या भाडयासाठी रिक्षा स्टॅण्डच्या मागे - पुढे रस्त्यात थांबवुन वाहतुकीस अडथळा निर्माण करित आहेत ; आणि,

ज्याअर्थी, अनधिकृत असलेल्या व वाहतुकीस अडथळा करणा-या रिक्षा थांब्यांच्या ठिकाणी रिक्षा थांबवुन रिक्षाचालक प्रवाशांची चढ-उतार करुन सार्वजनिक वाहतुकीस बाधा निर्माण करत असल्याचे आढळुन आले आहे ; आणि,

ज्याअर्थी, सिग्नल तसेच मुख्य रस्त्यावर / चौकात रिक्षा उभ्या करुन प्रवाशांची चढ-उतार करुन रिक्षा चालकांकडुन वारंवार सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला जात आहे आहे ; आणि,

ज्याअर्थी, रिक्षाचालक रस्त्यावर कोठेही गटागटाने रिक्षा थांबवुन मुख्य रस्त्यावरील डाव्या मार्गिका बंद करुन वाहतुक कोंडी करणेस कारणीभुत होत असल्याने रिक्षा थांब्याचे नियमन करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे ;

त्याअर्थी, मी, संदीप भानुदासराव पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७-०९-१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) व ११७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्याअनुषंगिक कर्तव्यार्थ खालीलप्रमाणे अधिसुचना निर्गमित करित आहे :-

रिक्षा थांब्याचे 'लघु स्टॅण्ड ( १ ते ५ रिक्षा)' , 'मध्यम स्टॅण्ड (६ ते १५ रिक्षा)' व 'मोठे स्टॅण्ड ( १६ ते २५ रिक्षा )' याप्रमाणे वर्गीकरण करणेत येवून, या वर्गीकरणा प्रमाणे चौक व चौकाचा परिघ वगळुन, दोन स्टॅण्डमधील किमान अंतर अर्धा व कमाल अंतर दोन कि.मी. ठेवुन , कायम अतिगर्दीचा रस्ता वगळुन, कोणत्याही वास्तु अगर आवाराचे प्रवेश व निकासास अडथळा निर्माण होणार नाही अशापध्दतीने मध्येच रिक्षा स्टॅण्ड राहणार नाही इत्यादी बाबी दृष्टीक्षेपात ठेवुन उल्हासनगर शहर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद व कुळगांव- बदलापुर नगरपरिषदेच्या क्षेत्रातील उपलब्ध जागेनुसार खालील ठिकाणी रिक्षांकरिता थांबे निर्धारित करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | युनिट | रिक्षा थांब्याचे ठिकाण | रिक्षा थांब्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर ट्रॅफिक युनिट | शहाड फाटक उल्हासनगर नं. १ हिरा कटिंग सलुन जवळ जवळ(म्हारंळकडे जाणरे प्रवाशी | मध्यम |
| २ | | शहाड फाटक उल्हासनगर नं. १ ऑटो रिक्षा स्पेअर पार्ट जवळ(उल्हासनगर कडे जाणारे प्रवाशी) | मोठा |
| ३ | | शिरू चौक खेमानीकडे जाणारे रोडवर | लघु |
| ४ | | खेमानी चौक कलानी बिल्डींग जवळ | लघु |
| ५ | | नेहरू चौक,उल्हासनगर २,नेताजी ट्रान्सपोर्टजवळ | मध्यम |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | उल्हासनगर ट्रॅफिक युनिट | न्यु इरा स्कुल उल्हासनगर ३ | लघु |
| ७ | | शिवाजी चौक एमएसईबी ट्रान्सफार्म जवळ | मध्यम |
| ८ | | प्रेम रामचंदानी चौक उ.नं ३ | लघु |
| ९ | | भारत सिनेमा | मध्यम |
| १० | | उल्हासनगर रेल्वे स्थानक | मोठा |
| ११ | | बिर्लागेट पोस्ट ऑफिस जवळ | लघु |
| १२ | | अमन सिनेमा | लघु |
| १३ | | मध्यवर्ती रूग्णालय | लघु |
| १४ | | पवई चौक | लघु |
| १५ | | अशोक सिनेमा | लघु |
| १६ | | साईरचना अपार्ट साधुबेला | मध्यम |
| १७ | | २४ स्कुल पोल जवळ | लघु |
| १८ | | पोस्ट ऑफिस जवळ उ.नं.१ | लधु |
| १९ | | आवतमल चौक | लघु |
| २० | | निरकारी हॉल उ.नं १ गोल मैदान | मध्यम |
| २१ | | मधुबन हॉटेल | मध्यम |
| २२ | | अमरधाम चौक उ.नं.१ | लघु |
| २३ | | चोपडा कोर्ट, उल्हासनगर | लघु |
| २४ | | शांतीनगर बस स्टॉप मागे | लघु |
| २५ | | पंजाबी कॉलनी उ.नं.३ | मध्यम |
| २६ | | सी ब्लॉक चौक,उ.नं.१ | मध्यम |
| २७ | | शास्त्री चौक १७ सेक्शन | मध्यम |
| २८ | | कमला नेहरू नगर धोबीघाट मच्छी मार्केट उ.नं.१ | मध्यम |
| २९ | | दुनीचंद कॉलेजजवळ | मध्यम |
| ३० | | फारवर लाईन | मध्यम |
| ३१ | | झुलेलाल चौक | मध्यम |
| ३२ | | विठठलवाडी रेल्वे स्टेशन | मोठा |
| ३३ | | गोल मैदान, संत निरंकारी हॉल | मध्यम |
| ३४ | | बस स्टॅन्ड | मध्यम |
| ३५ | | म्हारळनाका | मध्यम |
| ३६ | | महानगरपालिका | मध्यम |
| ३७ | | स्मशानभुमी | लघु |
| ३८ | | रेणुका चौक उ.नं.३ | मध्यम |
| ३९ | | ओटी सेक्शन नं.३ | लघु |
| ४० | | रमाबाई आंबेडकर चौक | लघु |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | विठठलवाडी ट्रॅफिक युनिट | प्रभाग समिती भाग ४ ऑफिसचे डावे बाजुला,व्हि.टी.सी. मैदानाचे भिंतीलगत , उल्हासनगर–४ | लघु |
| ४२ | | श्री. संत ज्ञानेश्वर चौक,हरी ओम सुपर मार्केटचे बाजुला, आशेळे पाडा,उल्हासनगर–४ | लघु |
| ४३ | | रामेश्वर कॉम्पलेक्स समोर,आशेळे रोड,उल्हासनगर–४ | लघु |
| ४४ | | चार नं. ओटी चौक,उल्हासनगर –४ | लघु |

# अंबरनाथ नगरपरिषद कार्यक्षेत्र

| अ.क्र. | युनिट | रिक्षा थांब्याचे ठिकाण | रिक्षा थांब्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ ट्रॅफिक युनिट अंबरनाथ (पुर्व) | शिवाजी चौक रेल्वे स्टेशन लगत रिक्षा स्टॅन्ड(शिवाजी चौक पासुन सुमारे ५० मी अंतरावर) | मोठा |
| २ | | बी केबीन रोड रिक्षा स्टॅन्ड(स्वानंद इमारत ते करंजुले यांचे कार्यालयापर्यंत) | मध्यम |
| ३ | | वेल्फेअर रिक्षा स्टॅन्ड वेल्फेअर कंपनीच्या कम्पौड लगत | मोठा |
| ४ | अंबरनाथ (पश्चिम) | अंबरनाथ पश्चिम रेल्वे स्टेशन लगत रिक्षा स्टॅन्ड (अंबरनाथ नगरपालिकेच्या पे अॅन्ड पार्कला लागुन) | मोठा |
| ५ | | लदीनाका रिक्षा स्टॅन्ड( जुन्या एस.टी.स्टॅड समोर) | मोठा |
| ६ | | उपकार हॉटेल शेजारी (उपकार हॉटेल पासुन सिदधार्थ नगरपर्यंत) | मोठा |
| ७ | | छत्रपती शिवाजी भाजी मार्केट स्टॅन्ड (भाजी मार्केट समोर) | मोठा |
| ८ | | चिचपाडा स्टॅन्ड(चिचपाडा) | मध्यम |
| ९ | | गांधी नाका स्टॅन्ड (अंबरनाथ उल्हासनगर रोडवर नगरपालिकेच्या भिंती लगत उल्हासनगरसाठी जाणाऱ्या रिक्षा) | मध्यम |
| १० | | एमएसइबी समोर स्टॅन्ड( एमएसइबी कार्यालयाच्या विरूद्धदिशेला अंबरनाथ बदलापुर रोड) | मध्यम |
| ११ | | आनंदनगर स्टॅड (एमआयडीसी रोडवर) | मोठा |

# कुळगांव –बदलापुर नगरपरिषद कार्यक्षेत्र

| अ.क्र. | युनिट | रिक्षा थांब्याचे ठिकाण | रिक्षा थांब्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ ट्रॅफिक युनिट (बदलापुर पुर्व) | बदलापुर पुर्व रेल्वे स्टेशन मेन स्टॅड (शिरगाव आपटेवाडी जाण्यासाठी क्लिनक्लेअर शौचालयापासुन स्कायवॉकच्या अर्ध्यापर्यंत रेल्वे कुंपण लागत शौचालयाकडे तोंड करून) | मोठा |
| २ | | बदलापुर पुर्व रेल्वे स्टेशन स्टॅन्ड स्कायवॉक उतरतो तेथुन स्कायवॉकच्या अर्ध्यापर्यंत रेल्वे कुंपण लगत स्कायवॉक उतरतो त्या दिशेने तोंड करून कात्रपला जाण्यासाठी | मोठा |
| ३ | | मानकेवली रिक्षा स्टॅन्ड नगरपालिकेच्या प्रस्तावित कार्यालयाच्या गेटपासुन गणपती मंदीरापर्यंत रेल्वे स्टेशन कडे तोंड करून मानकेवली जाण्यासाठी | मोठा |

| अ.क्र. | युनिट | रिक्षा थांब्याचे ठिकाण | रिक्षा थांब्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ (बदलापुर पश्चिम) | बदलापुर पश्चिम रेल्वे स्टेशन स्टॅड रेल्वे स्टेशनच्या तिकीट घरापासुन रेल्वे कुंपण लागत तिकीट दिशेला तोंड करून ) | मोठा |
| २ | | एरजांड रिक्षा स्टॅड (झुणका भाकर केंद्राशेजारी सुलभ शौचालयाच्या दिशेने तोंड करून) | मध्यम |
| ३ | | रमेशवाडी ,हेंद्रेपाडा रिक्षा स्टॅड मीटरप्रमाणे( सुलभ शौचालयापासुन रेल्वे कुपणालगत अर्ध्या स्कायवाक पर्यंत सुलभ शौचालयाकडे तोंड करून) | मध्यम |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | (बदलापुर पश्चिम) | रमेशवाडी ,हेंद्रेपाडा शेअरिंग(साळुंखे ऑप्टीक्सपासुन पंचरत्न रेस्टॉरंटपर्यंत रेल्वे स्टेशनकडे तोंड करून) | मध्यम |
| ५ | | वडवली बेलवली रिक्षा स्टॅंड (पोलीस चौकी समोरील रस्त्यावर ) | मध्यम |
| ६ | | शांतीनगर रिक्षा स्टॅंड प्रकाश टिंबरपासुन  महालक्ष्मी मंदिरापर्यंत | मध्यम |
| ७ | | अंबरनाथ रिक्षा स्टॅंड भालेनाथ किरणा स्टोर पासुन बदलापुर एस टी स्टॅन्ड कडे तोंड करून अंबरनाथला जाण्यासाठी | मध्यम |

सदरची अधिसुचना दिनांक ०१-०९-२०१६ पासुन तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर लागु  करण्यात येत आहे. या संदर्भातील यापुर्वीच्या सर्व अधिसुचना या अधिसुचनेव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. या कालावधित काही सुचना / आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात पोलीस उपायुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.रोड, ठाणे (पश्चिम) येथे कळवावेत. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन तिमाहित काही सुचना वा आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढे सदरची अधिसुचना कायमस्वरुपी अंमलात राहील.

(संदीप भा.पालवे)
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दि अधिकारी, ठाणे

२/- या अधिसुचनेची प्रसिध्दि करणेस आपणास विनंती करणेत येत आहे.

प्रत मा.सविनय सादर :-
१.मा.पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर
२.मा.पोलीस सह आयुक्त सो, ठाणे शहर.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर
मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर .
मा.मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगांव - बदलापुर नगरपरिषद.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी लघु, मध्यम व मोठे याप्रमाणे सुयोग्य रिक्षा स्टॅण्डचे फलक लावणेबाबत तसेच सदर रिक्षा स्टॅण्ड करिता सुयोग्य लोखंडी रेलींग बसविणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत कार्यवाहीस्तव
१. वाहतुक सपोआ.वाहतुक उपविभाग, उल्हासनगर.
२.प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ ट्रॅफिक युनिट

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, ठाणे.
२/- कृपया सदरची अधिसुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर.
२/- त्यांनी याबाबतची प्रसिध्दि ई पोलीस पत्रकात द्यावी.